दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १७६/२०२५. **CNR. No.MHBU**090012002025.
दयाराम तोताराम लोखंडे व इतर –वि– कोणीही नाही. नि. क्र. १ वर आदेश.

# <u>निशाणी क्र. १ वर आदेश</u>

(दि. २५/०३/२०२६)

अर्जदारांनी सदरचा अर्ज वारसाचे प्रमाणपत्र मिळणेकामी दाखल केलेला आहे. अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ चे वडील मयत तोताराम नामदेव लोखंडे हे दि. २३/०५/१९९८ रोजी परसरामपुर, ता. जळगाव जामोद, जि. बुलढाणा येथे मयत झाले तसेच अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ ची आई मयत मनकर्णाबाई तोताराम लोखंडे ह्या दि. २४/१०/२००७ रोजी काजेगाव, ता. जळगाव जामोद, जि. बुलढाणा येथे मयत झाल्या. सदरहु मयत तोताराम मोतीराम खराटे व नर्मदाबाई तोताराम खराटे यांच्या पश्चात अर्जदार यांचे शिवाय सदर मयत तोताराम नामदेव लोखंडे व मनकर्णाबाई तोताराम लोखंडे यांना इतर कोणीही वारस नाही.

२. अर्जदारांच्या अर्जातील कथनानुसार त्यांना शासकीय व निमशासकीय योजनाचा लाभ घेण्याकरीता तसेच औपचारीक कामाकरीता प्रस्तुत प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने त्यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. या अर्जासोबत अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ चे आई–वडील यांच्या मृत्यु प्रमाणपत्राच्या मुळ प्रती अनुक्रमे नि. क्र. १३ व १४ वर दाखल केल्या आहेत. तहसिलदार, जळगांव जामोद यांचे समक्ष केलेल्या प्रतिज्ञालेखाची मुळ प्रत नि.क्र. १५ वर दाखल आहे. अर्जदार क्र. ०१ ते ०४ यांच्या आधार कार्डच्या पडताळणीकृत प्रती अनुक्रमे नि. क्र. १६ ते १९ वर दाखल केल्या आहेत.

३. अर्जातील कथनांस व विनंतीस कोणाचा आक्षेप आहे की नाही, हे पडताळुन पाहणेकामी अर्जातील मजकुराची जाहीर प्रसिध्दी स्थानिक वृत्तपत्र 'दै. सायरन' च्या दि. ०६/१२/२०२५ च्या आवृत्ती (नि. क्र. २०) मध्ये प्रसिध्द केली गेली. सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ते हा आदेश होईपर्यत कोणत्याही व्यक्तीचा विरोध वा आक्षेप या न्यायालयास प्राप्त झाला नाही. अर्जदार क्र. ०१ यांची साक्ष नि. क्र. १२ वर शपथपत्राद्वारे

नोंदविण्यात आली आहे. त्यांची साक्ष ही उलट तपासविना असल्यामुळे अबाधित आहे. शपथपत्रातील केलेले अभीकथन हे अर्जातील नमुद कथनांस मिळते जुळते आहे. अर्जदाराचा पुरावा असे दिर्शवितो की, मयत नामे तोताराम नामदेव लोखंडे व मनकर्णाबाई तोताराम लोखंडे हे अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ चे आई–वडील होते. तेव्हा अर्जातील कथन, तोंडी व कागदोपत्री पुरावा ईत्यादीचा विचार करता हे सिध्द होते की, अर्जदार क्र. ०१ ते ०४ हे सदरहु मयत तोताराम नामदेव लोखंडे व मनकर्णाबाई तोताराम लोखंडे यांचे पश्चात कायदेशीर वारस आहेत. त्यांच्याशिवाय इतर कोणीही वारस नाही म्हणुन सदर पुरावा ग्राहय धरणे योग्य होईल. सबब, असा निश्कर्ष काढण्यात येतो की, अर्जदार हे मयताचे 'वारसाचे प्रमाणपत्र' मिळण्यास पात्र आहेत.

४. अर्जाचे (निशाणी क्र.१) अवलोकन केल्या नंतर ही बाब प्रकर्षाने जानवते की, अर्जा मध्ये शासकीय व निम शासकीय कार्यालय, योजनांचा लाभ घेण्यासाठी तसेच औपचारीक कामा साठी प्रमाणपत्राची मागणी केली आहे. परंतु महाराष्ट्र न्यायालयीन शुल्क अधिनियम, १९५९ [The Maharashtra Court Fee Act, (Bom. Act No. XXXVI of 1959)] च्या परिशीष्ट–एक (Schedule–I) नुसार संपत्तीच्या किंमती वर न्यायालयीन मुद्रांक/शुल्क द्यावा लागतो. परंतु अर्जामध्ये तसे नमुद केलेले नाही. त्यामुळे, प्रस्तुत प्रकरण मंजुर झाल्यानंतर मिळणारे प्रमाणपत्र हे शासकीय व निमशासकीय कार्यालयात, योजनांचा लाभ घेण्यासाठी तसेच औपचारीक कामासाठी वापरता येणार नाही व तसे मोघम प्रमाणपत्र देणे न्यायोचीत होणार नाही.

५. प्रस्तुत चे प्रकरण मंजुर झाल्या नंतर मिळणारे प्रमाणपत्र हे कोणत्याही मालमत्तेसाठी, संपत्तीसाठी वापरता येणार नाही, कारण की, मोघम प्रमाणपत्र देणे न्यायोचीत होणार नाही, करीता खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १७६/२०२५.** **CNR. No.MHBU**090012002025.

**दयाराम तोताराम लोखंडे व इतर –वि– कोणीही नाही.** **नि. क्र. १ वर आदेश.**

१. अर्ज अंशत: मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र. ०१ ते ०४ हे मयत तोताराम नामदेव लोखंडे व मनकर्णाबाई तोताराम लोखंडे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र त्यांनी योग्य ते न्यायालयीन शुल्क भरल्यावर निर्गमीत करण्यात यावे.

३. अर्जदार यांना निर्देश देण्यात येते की, भविष्यात कोणी सदरच्या मयतास वारस म्हणून हक्क दाखविल्यास सदरचे वारस प्रमाणपत्र हे न्यायालयास अभ्यार्पित करावे लागेल. त्यांनी या आशयाचे शपथपत्र न्यायालयात दाखल करावे.

४. प्रस्तुत चे प्रकरण मंजुर झाल्या नंतर मिळणारे प्रमाणपत्र हे शासकीय व निम शासकीय कार्यालयात, योजनांचा लाभ घेण्यासाठी तसेच औपचारीक कामासाठी वापरता येणार नाही.

५. प्रस्तुत चे प्रकरण मंजुर झाल्या नंतर मिळणारे प्रमाणपत्र हे कोणत्याही मालमत्तेसाठी, संपत्तीसाठी वापरता येणार नाही.

Digitally signed by PRITI DNYANESHWAR MENDHE
Date: 2026.03.27 11:00:53 +0530

**ठिकाण– जळगाव (जामोद).** **(श्रीमती प्रिती डी. मेंढे)**

**दिनांक– २५/०३/२०२६.** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर, जळगाव (जामोद).**

**प्र मा ण प त्र**

मी प्रमाणित करते की या पि.डी.एफ. आदेश फाईलमधील मजकुर हा मुळ आदेशातील मजकुराशी शब्दांशब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नावः– दिपक के. मतकर, निम्नश्रेणी लघुलेखक.

कोर्टाचे नावः– दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, जळगाव जामोद.

दिनांकः– २७/०३/२०२६.